# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६, फॅक्स क्रं.:- ०७१२-२५६१६६३

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

क्रमांक :- तंशिस/विकाना/शैवि/ईबीसी /2018/ 3606

दिनांकः- 29 OCT 2018

प्रति,

प्राचार्य /संचालक,
सर्व शासकीय,खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,
नागपूर विभाग.

विषयः- राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेच्या अंमलबजावणीमध्ये येणा-या अडचणींचे निराकरण करण्यांबाबत.

संदर्भः- 1.मा.संचालक,तंशिसं,म.रा.मुंबई यांचे कार्यालयाचे पत्र.18/तंशिसं/वि.का. पत्र /2018/334/ दि.28/09/2018.
2.महाराष्ट्र शासन,उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-2018/प्र.क्र. 237/तांशि-4, दि.24/07/2018

उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष 2018-19 मध्ये आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील प्रवेशित विद्यार्थ्यांकडुन प्रवेशाच्या वेळी शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शिक्षण शुल्काच्या केवळ 50 टक्के इतकी रक्कम शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थ्यांकडुन घ्यावी, यापेक्षा जास्त शुल्क विद्यार्थ्यांकडुन घेण्यांत येउ नये, अशा सुचना संदर्भिय पत्र क्र. 02 अन्वये देण्यांत आलेल्या आहेत. तथापि काही संस्थांनी, त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी केलेली नसल्याबाबतच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त होत आहेत.

तरी सर्व संस्थांना कळविण्यांत येते की, त्यांनी संदर्भिय शासन निर्णयाच्या अटी व शर्तीनुसार संस्थांस्तरावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सहपत्रः- वरीलप्रमाणे

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपुर

E/SAPNA KOWE/OFFICE LETTER/INSTT. 2017-18

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक-संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२३७/तांशि-४

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
खो.क्र.४४१, चौथा मजला,
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दूरध्वनी क्र.०२२-२२०४०९३५
दिनांक : २४ जुलै, २०१८

प्रति,
संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,
मुंबई

**विषय : राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क योजनेच्या अंमलबजावणीमध्ये येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्याबाबत.**

संदर्भ :- १) शासन निर्णय,क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दि.७/१०/२०१७
२) शासन समक्रमांकाचे दिनांक २० जून,२०१८ पत्र

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शिक्षण शुल्काच्या केवळ ५० टक्के इतकी रक्कम शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थ्यांकडून घ्यावी, यापेक्षा जास्त शुल्क विद्यार्थ्यांकडून घेण्यात येऊ नये, अशा सूचना आपल्या अधिपत्याखालील सर्व संबंधित संस्थांना तात्काळ द्याव्यात, अशा सूचना संदर्भाधिन दिनांक २०/६/२०१८ च्या पत्रान्वये आपणास देण्यात आल्या आहेत. तथापि, त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी होत नसल्याच्या काही तक्रारी शासनाकडे प्राप्त होत आहेत. संदर्भाधिन दिनांक ७/१०/२०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदींचे पालन काही संस्था करीत नसल्यास अशा संस्थांना, "त्यांनी चालवित असलेल्या अभ्यासक्रमांसाठी दिलेली शासन मान्यता रद्द का करण्यात येऊ नये" अशा स्वरुपाची नोटीस देण्यात यावी.



का १८
श्री पंडीत
संचालक तंत्र शिक्षण ... मुंबई
नोंदणी : स्था. 1868
दिनांक २७/७/18

३. तसेच ही योजना प्रभावीपणे राज्यात राबविण्यासाठी या योजनेच्या अनुषंगाने येणाऱ्या अडचणींबाबत सर्व विभागीय तंत्र शिक्षण सहसंचालकांनी नमुनेदाखल त्यांच्या कार्यक्षेत्रातील काही संस्थांना भेटी द्याव्यात व लाभार्थी विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधून या योजनेतील अडचणींचे निराकरण करण्याच्या दृष्टीने तात्काळ कार्यवाही करावी.

४. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी मा.मुख्य सचिव तथा वरिष्ठ पातळीवर आढावा घेण्यात येत आहे. त्यामुळे योजनेच्या अंमलबजावणीमधील ज्या अडचणींचे निराकरण शासन पातळीवरुन होणे आवश्यक आहे, अशा बाबी सचिवांच्या थेट निदर्शनास आणाव्यात.

( संजय औ.धारुरकर )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
२) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे